# जनसंपर्क विभाग

जळगाव दि. १५ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अधिसभेची बैठक उद्या गुरूवार दि. १६ मार्च रोजी होणार आहे. या बैठकीत विद्यापीठाचा अर्थसंकल्प मांडला जाणार असून व्यवस्थापन परिषदेवर अधिसभेतून सदस्य निवडून दिले जाणार आहेत.

सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या सिनेट सभागृहात बैठक होणार आहे. निवडून आलेले आणि नामनिर्देशन झालेल्या अधिसभा सदस्यांची ही पहिलीच बैठक आहे. उद्याच्या बैठकीत सन २०२३-२४ चा अर्थसंकल्प मांडण्यात येणार आहे. व्यवस्थापन परिषदेवर अधिसभेतून सात सदस्य निवडून दिले जाणार आहेत. यामध्ये प्राचार्यांच्या खुल्या संवर्गात एका जागेसाठी दोन अर्ज असल्यामुळे या जागेसाठी निवडणूक होईल. व्यवस्थापन प्रतिनिधींच्या दोन जागांसाठी खुल्या संवर्गातून आणि अनुसूचित जमाती संवर्गातून प्रत्येकी एक अर्ज, अध्यापकांच्या खुल्या संवर्गातील एका जागेसाठी एक अर्ज याच गटातील विमुक्त जाती व भटक्या जमाती या संवर्गात एका जागेसाठी एक अर्ज प्राप्त झालेले आहेत. आणि पदवीधर गटातून खुल्या संवर्गातून एका जागेसाठी एक आणि इतर मागासवर्ग संवर्गातून एका जागेसाठी एक अर्ज प्राप्त झालेले आहेत. या सहा जागा बिनविरोध होणार असल्या तरी निवडून आल्याची अधिकृत घोषणा सभागृहात उद्या केली जाईल. याशिवाय तक्रार निवारण समिती, विद्यापरिषद, स्थायी समिती यावर देखील सदस्यांचे नामनिर्देशन उद्याच्या बैठकीत केले जाईल.

## बातमी क्रमांक २

जळगाव दि. १५ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षातर्फे घेण्यात आलेल्या परिसर मुलाखतीव्दारे दोन विद्यार्थ्यांची ओरीयन्ट सिमेंट, सीके बिर्ला ग्रुप कंपनीत नियुक्ती झाली आहे.

स्कुल ऑफ केमिकल्स सायन्सेसच्या विद्यार्थ्यांसाठी या ऑनलाईन मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. या कंपनीचे मनुष्यबळ विकास विभागातील अधिकारी रिमा पिळगावकर, रोहित जोशी यांनी मुलाखती घेतल्या यामध्ये मयुर पाटील व जयेश महाजन या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. कक्षाचे समन्वयक प्रा. रमेश सरदार, उपसमन्वयक डॉ. उज्वल पाटील, प्लेसमेंट ऑफिसर सोनाली दायमा यांनी मुलाखतीचे व्यवस्थापन केले. कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, प्रशाळेचे संचालक प्रा. डी. एच. मोरे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी अभिनंदन केले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक:१५ मार्च, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी